# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,

17, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे - 01

दूरध्वनी क्र. -020-26123066/67 वेबसाईड - www.mscepune.in ई-मेल mscepune@gmail.com

**दरपत्रक सूचना**

जा.क्र.मरापप/भांडार/बाह्य लेखा/2023/1790

दिनांक :- 10 /04/2023

प्रति,

---------------------

---------------------

---------------------

**विषय** :- परिषदेचे सन 2023-2024 चे बाह्य लेखापरीक्षण बाबत **"सनदी लेखापाल"** यांची नियुक्ती करणेसाठी दरपत्रक सादर करणेबाबत..

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-01, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-01 येथे कार्यालय कार्यरत आहे. परिषदेचे सन 2023-2024 चे बाह्य लेखापरीक्षण बाबत **"सनदी लेखापाल"** यांची नियुक्ती करावयाची असून खालील तपशिलानुसार व नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून दरपत्रके मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचा तपशिल | दर एकत्रित / सर्व करांसहित (रुपये) |
|---|---|---|
| 1. | लेखापरिक्षण अहवाल | |
| 2. | ताळेबंद पत्रक | |
| 3. | उत्पन्न व खर्च पत्रक | |
| 4. | इतर शेड्युल्स | |

**अटी व शर्ती** -

1. दरपत्रकामध्ये भरण्यात येणारे दर अक्षरी व अंकात नमूद करावे. त्यामध्ये खाडाखोड करु नये. अपवादात्मक खाडाखोड असलेले दरपत्रक ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.
2. नमूद केलेले दर सर्व करासहित आकारलेले असावे.
3. पॅन व जीएसटी नोंदणी असणे आवश्यक आहे.
4. सनदी लेखापाल संस्था शासनाच्या काळ्या यादीमध्ये नाव असल्यास सदर संस्था अपात्र ठरविली जाईल.
5. सनदी लेखापाल यांचे कार्यालय महाराष्ट्र राज्यात, पुणे येथे असणे आवश्यक आहे.
6. सनदी लेखापालाने नमूद शासकीय कार्यालयांमध्ये अभिलेख ताळेबंद विषयक कामकाज केलेले असावे.
7. दरपत्रकासोबत सादर करण्यात आलेल्या कागदपत्रे व न्यूनतम दराच्या आधारे संस्थेची निवड करण्यात येईल.
8. यशस्वी निविदाकासोबत रुपये 500/- रकमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करण्यात येईल.
9. दरपत्रक सादर (भरताना) करताना अटी व शर्ती नमूद केलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाहीत.

**दरपत्रकासोबत खालील कागदपत्रे जोडण्यात यावी.**

1. संस्था स्थापनेबाबत नोंदणीकृत प्रमाणपत्र.
2. पॅन व जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र.

Internal

3. मागील दोन वर्षाचे ताळेबंद अहवाल.
4. केंद्र शासन व राज्य शासनाच्या संस्थेमध्ये किंवा सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांमध्ये काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र जोडण्यात यावे.
5. शासन अंगीकृत संस्थामध्ये काळ्या यादीमध्ये नाव नसल्याबाबतचे स्वयंघोषित प्रमाणपत्र.

सदर कामासाठी भाग घेण्यासाठी इच्छूक संस्थांनी उपरोक्त निकष पूर्ण करीत असल्यास दरपत्रकासोबत कामाचा तपशिल तक्ता संस्थेनी संस्थेच्या लेटरहेडवर नमूद करुन सीलबंद लखोटा/पाकिट सादर करण्यात यावे. दरपत्रकासोबत वरील नमूद कागदपत्रे जोडण्यात यावी.

बंद पाकिटावर **परिषदेचे सन 2023-2024 चे बाह्य लेखापरीक्षणा बाबत "सनदी लेखापाल" नियुक्ती करणे दरपत्रक** असे स्पष्ट नमूद करुन दि.17/04/2023 रोजी दुपारी 03.00 वाजेपर्यंत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे कार्यालयात हस्तपोच / सादर करण्यात यावी.

दरपत्रके उघडण्याचा दिनांक शक्य असल्यास दि. 19/04/2023 रोजी किंवा परिषदेच्या सोईनुसार उघडण्यात येईल.

टपालाव्दारे/मेलव्दारे/कुरीअर व्दारे प्राप्त दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत. तसेच कोणतेही कारण नमूद करुन अथवा असे कारण न देता आलेल्या एक अथवा सर्व दरपत्रके स्विकारणे अथवा फेटाळणेचा अधिकार मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांना राहतील.

Swaray 19/4/2023

(शैलजा दराडे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - 411001